<table>
<tr><td rowspan="2">MHGO040009882022</td><td colspan="2">न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांच्या न्यायालयात, ता. आमगांव.<br>(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)<br>[न्यायनिर्णय दि.०६/०५/२०२६]<br>सं.फ़ौ.ख.क्र. ४८४/२०२२<br>कालावधीःव.०३,म.०८,दि.१४. नि. क्र.३७</td></tr>
<tr><td colspan="2">( गुन्हा क्र. २३२/२०२१, पोलीस स्टेशन, सालेकसा )</td></tr>
<tr><td>अभियोगपक्ष</td><td></td><td>महाराष्ट्र सरकारतर्फे<br>पोलीस स्टेशन, सालेकसा,<br>ता. सालेकसा, जि. गोंदिया.</td></tr>
<tr><td>सहा. सरकारी वकील</td><td></td><td>विधिज्ञ श्री एम. के. बोरीकर.</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td>१.<br><br>२.<br><br><br>३.<br><br>४.<br><br><br>५.<br><br>६.<br><br>७.</td><td>सतिश गणपत येतरे,<br>वयः ३४ वर्षे,व्यवसाय – मजूरी,<br>सुभाष रमेश वाघाडे,<br>वयः ३१ वर्षे,व्यवसाय – मजूरी,<br>आरोपी क्र. १ व २ रा. आमगांव खुर्द, सालेकसा, जि. गोंदिया.<br>विलोम सुक्रम भिमटे,<br>वयः ३२ वर्षे,व्यवसाय – मजूरी,<br>दिलीप भोला वाघाडे,<br>वयः ५० वर्षे,व्यवसाय – मजूरी,<br>आरोपी क्र. ३ ते ७ रा. तिरखेडी, ता. सालेकसा जि. गोंदिया.<br>संजय केदारनाथ अग्रवाल, (Discharge)<br>वयः ४२ वर्षे,व्यवसाय – मजूरी,<br>विश्वनाथ भोजराज फुंडे, (Plead Guilty)<br>वयः ३२ वर्षे,व्यवसाय – मजूरी,<br>सुभाष भेनाथ गायकवाड, (Plead Guilty)<br>वयः ३० वर्षे,व्यवसाय – मजूरी,</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | आरोपी क्र. ३ ते ७ रा. तिरखेडी, ता. सालेकसा जि. गोंदिया. |
| **आरोपी क्र.१, २ व ७ तर्फे वकील**<br><br>**आरोपी क्र. ३ तर्फे वकील**<br>**आरोपी क्र. ४ व ५ तर्फे वकील**<br><br>**आरोपी क्र. ६ तर्फे वकील** | | **विधिज्ञ श्री पी. पी. थेर.**<br><br><br>**विधिज्ञ श्री ए. एन. गुप्ता.**<br>**विधिज्ञ श्री यु. बी. नागपुरे.**<br><br>**विधिज्ञ श्री ए. पी. बोरकर.** |

| | |
|---|---|
| **घटना घडल्याचा दिनांक** | दि.२५.०९.२०२१. |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | दि.२५.०९.२०२१. |
| **फिर्यादची तारीख** | दि.२५.०९.२०२१. |
| **दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख** | दि.२८.०८.२०२२. |
| **फिर्याद दाखल तारीख** | दि.२३.०८.२०२२. |
| **आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख** | दि.२६.०८.२०२५. |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | दि.२४.०२.२०२३. |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख** | -- |
| **न्यायनिर्णय तारीख** | दि ०६.०५.२०२६. |
| **आरोपीला शिक्षा सुनावल्याची तारीख** | -- |

## आरोपीची माहिती

| | |
|---|---|
| **आरोपी क्र. १ चे नाव** | सतिश गणपत येतरे, |
| **आरोपी क्र.२ चे नाव** | सुभाष रमेश वाघाडे, |
| **आरोपी क्र. ३ चे नाव** | विलोम सुक्कम भिमटे, |
| **आरोपीचे क्र. ४ चे नाव** | दिलीप भोला वाघाडे, |
| **आरोपीचे क्र. ५ चे नाव** | संजय केदारनाथ अग्रवाल, (Discharge) |
| **आरोपीचे क्र. ६ चे नाव** | विश्वनाथ भोजराज फुंडे, (Plead Guilty) |

| | |
|---|---|
| **आरोपीचे क्र. ७ चे नाव** | सुभाष भेनाथ गायकवाड, (Plead Guilty) |
| **अटकेची तारीख** | दि. २५.०९.२०२१. |
| **आरोपीला जामिनावर सोडल्याची तारीख** | दि. २५.०९.२०२१. |
| **दोषारोप** | म. जु. का. कलम १२ (अ) प्रमाणे. |
| **शिक्षा देण्यात आली कि निर्दोष सोडण्यात आले** | निर्दोष सोडण्यात आले. |
| **देण्यात आलेली शिक्षा** | -- |
| **आरोपी केस दरम्यान किती दिवस तुरूंगात होता** | -- |

**साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार**

**अ) अभियोगपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच)** |
|---|---|---|
| अ.सा.१ | रामप्रसाद कार्तिक तुमडे, | पंच साक्षदार (नि. क्र. ३३ ) |
| अ.सा.२ | विलास सुदाम फुंडे, | पंच साक्षदार (नि. क्र. ३५ ) |

**ब) बचावपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट साक्षीदार:**

| **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र.**

**अ) अभियोगपक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ब) बचावपक्ष**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड) मुद्देमाल**

| क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**:: न्या य नि र्ण य ::**

**(दिनांक ०६ मे २०२६ रोजी घोषित)**

प्रस्तुतचा खटला महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये आरोपींविरुध्द दाखल करण्यात आला आहे.

अभियोगपक्षाचे वतीने मांडण्यात आलेली वस्तुस्थीती खालील प्रमाणे;

२. फिर्यादी पो. हवा. यशवंत हेतराम शहारे, यांनी अशी फिर्याद दिली आहे की, दिनांक २५.०९.२०२१ रोजी १६:०० ते १७:०० वाजताच्या दरम्यान मौजा ईसनाटोला येथे पेट्रोलिंग करत असतांना ईसानटोला शेत शिवारामध्ये आरोपी क्र. १ ते ७ हे सर्व आपसात संगनतम करुन स्वतःच्या फायदासाठी सार्वजनीक ठिकाणी तासाच्या पत्यावर पैसाची हारजीत जुगार खेळ खेळतांना मिळून आले. म्हणुन त्यांनी आरोपीविरुद्ध सालेकसा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन सालेकसा पोलीस स्टेशन गु.र.क्र. २३२/२०२१ महाराष्ट्र

जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये आरोपींविरुध्द दाखल करण्यात आला व गुन्ह्याचा तपासकाम ना. पो. हवा. महेबुब सय्यद यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी फिर्यादीचे लेखी रिपोर्ट, अटक पंचनामा, जप्ती पंचनामा, साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. या न्यायालयाने आरोपपत्रावरुन दखल घेवून, आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये प्रमाणे अन्वये आरोपाचा सारांश नि. क्र. ३१ प्रमाणे निश्चित करण्यात आला. आरोपीने निवेदनाद्वारे आरोपाचा सारांश मान्य नसल्याचे कळविले व संपरीक्षेची मागणी केली.

५. अभियोगपक्षाने खटल्याच्या पुष्टयर्थ केवळ दोन साक्षीदार तपासले आहे. पंच सा. क्र. १ रामप्रसाद कार्तिक तुमडे यास नि. क्र. ३३ वर आणि पंच सा. क्र. २ विलास सुदाम फुंडे यास नि. क्र. ३५ वर साक्ष नोंदवली. अभियोगपक्षाने नि. क्र. ३६ वर पुर्शिस दाखल करुन, त्यांचा साक्षीपुरावा बंद केला. तसेच अभियोगपक्षाच्या साक्षीपुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही आले नसल्याने, नि. क्र. १ वर आदेश पारित करुन, फौजदारी प्रकिया सहिंता चे कलम ३१३ (१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन वगळण्यात आले.

६. अभियोगपक्षाचे व आरोपीच्या वतीने त्यांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझेपुढे खालील मुद्दे उपस्थीत होतात ते निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो काय की, दिनांक २५.०९.२०२१ रोजी १६:०० ते १७:०० वाजताच्या दरम्यान मौजा ईसानटोला शेत शिवारामध्ये सर्व आरोपी हे स्वतःच्या फायदासाठी सार्वजनीक ठिकाणी तासाच्या पत्यावर पैसाची हारजीतचा जुगार खेळ खेळतांना आढळून आले काय ? | नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

– **<u>का र ण मि मां सा</u>** –

**<u>साक्षीपुरावाः–</u>**

७. सदर खटल्यात पंच सा. क्र. १ रामप्रसाद कार्तिक तुमडे आणि पंच सा. क्र. २ विलास सुदाम फुंडे यांनी अभियोगपक्षास अनुकूल साक्ष दिली नसल्याने सरकारी वकिलांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासात प्रश्न विचारले. मात्र त्यामध्ये कोणतीही बाब अभियोगपक्षाच्या कामी आली नाही. सदर साक्षदारांचे आरोपीतर्फे वकिलांनी उलटतपास नकारला.

**<u>मुद्दा क्र. १ करिता:</u>**

८. एकंदरीत पुराव्याचा अवलोकन केले असता, असे दिसून येते की, पंच सा. क्र. १ रामप्रसाद कार्तिक तुमडे आणि पंच सा. क्र. २ विलास सुदाम फुंडे यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा निसंशयरित्या सिद्ध झालेला नाही. तसेच घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण असले तरी एकही स्वतंत्र साक्षीदार अभियोगपक्षाने तपासले नाही. तसेच अभियोगपक्षाने तपासी अधिकारी व दाखल अधिकारी यांची साक्ष नोंदवली नाही. आरोपीवर आरोप सिद्ध करण्याकरिता फिर्यादीची साक्ष बाधक ठरते. परंतु, वारंवार संधी देवून ही अभियोगपक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदवली नाही. म्हणून अभियोगपक्षाच्यावतीने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यावरुन, सर्व आरोपी दिनांक २५.०९.२०२१ रोजी १६:०० ते १७:०० वाजताच्या दरम्यान मौजा ईसानटोला शेत शिवारामध्ये स्वतःच्या फायदासाठी सार्वजनीक ठिकाणी तासाच्या पत्यावर पैसाची हारजीतचा जुगार खेळ खेळतांना आढळून आले, ही बाब निःसंशयरित्या अभियोगपक्षाने सिद्ध केलेले नाही. म्हणुन आरोपी क्र. १ ते ४ यांना प्रस्तुत गुन्हासाठी दोषी धरता येत नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

९. प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्र. ५ संजय केदारनाथ अग्रवाल याचे मृत्यु बाबतचे प्रमाणपत्र पोलिसांनी न्यायालयात दाखल केले. म्हणून दिनांक २६.०८.२०२५ रोजी नि. क्र. १ वर आदेश पारित करुन त्याच्याविरुद्ध खटला खारिज करण्यात आला. अशा परिस्थितीत आरोपी क्र. १ ते ४ यांना प्रस्तुत प्रकरणातून निर्दोष मुक्त करणे योग्य व संयुक्तिक होईल. परिणामी, मी मुद्दे क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिता:–</u>**

१०. प्राप्त परिस्थिती व मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष लक्षात घेवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष

नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र. १ **सतिश गणपत येतरे,** आरोपी क्र. २ **सुभाष रमेश वाघाडे**, आरोपी क्र. ३ **विलोम सुक्रम भिमटे** आणि आरोपी क्र. ४ **दिलीप भोला वाघाडे,** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये, मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) अंतर्गतच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र. ५ **संजय केदारनाथ अग्रवाल** मयत झाल्यामुळे त्याच्याविरुद्ध खटला खारीज करण्यात आला.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ अन्वयेची पुर्तता करावी .

४. जप्त मद्देमाल म्हणजे, नगदी रू. ५७५०/– अपील कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावे.

५. जप्त मुद्देमाल म्हणजे, ५२ तासपत्ते मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

६. जप्त मुद्देमाल म्हणजे, मोटर सायकल क्र. एम. एच. ३५–ए–डी–५६०२ मुळ मालकास सुपुर्तनाम्यावर देण्यात आला असुन त्याचा ताबा अपील कालावधीनंतर कायम करण्यात येते.

७. जप्त मुद्देमाल म्हणजे, होंडा कंपनीची शाईन मोटर सायकल बिना नंबरची याचा ताबा मुळ मालकास ओळख पटवून अपील कालावधीनंतर देण्यात यावा.

८. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.05.06 15:28:12 +0530

आमगाव. ( ए. आर. जोशी )
दिनांकः ०६.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.